# पुणे व पिंपरी चिंचवड मनपा क्षेत्रातील
# इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया-२०१७-१८ प्रसिध्दी निवेदन
# अंतिम प्रवेश फेरी
## प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य-२ (FCFS-२) दि.१९.०९.२०१७

उपरोक्त विषयानुसार सविनय सादर करण्यात येते की, **इ. ११वी ऑनलाईन प्रवेशाचे कामकाज पुणे, मुंबई सह नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर या महानगरपालिका क्षेत्रात शासन निर्णय दि. ०७.०१.२०१७ अन्वये सुरु करण्यात आलेले आहे. आज अखेर दिनांक ११.०९.२०१७ इ. ११ वी ऑनलाईन प्रवेशाची दुस-या विशेष फेरीतील प्रवेश होत आहेत, आज अखेर नियमित चार फे-या, विशेष फेरी-१ , प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य-१ व दुसरी विशेष फेरी अशा एकूण ०७ फे-या झालेल्या आहेत. आलेल्या एकूण अर्जांपैकी ९७ टक्क्यांपेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेले आहेत.**

**इ. १० वी पुरवणी परिक्षेचा निकाल तसेच अद्यापही प्रवेश न मिळालेल्या उर्वरित विद्यार्थ्यांकरिता प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य या तत्वावर (FCFS-2) या फेरीचे आयोजन दि. १९.०९.२०१७ ते २५.०९.२०१७ अखेर करण्यात येत असून ही <u>अंतिम फेरी</u> असून यानंतर प्रवेश प्रक्रिया बंद होईल. याफेरी फेरीमध्ये पुढील प्रकारचे कामकाज सुरु राहणार आहे.**

**१) दिनांक १९.०९.२०१७ ते २४.०९.२०१७ सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत प्रथम प्राधान्य या तत्वावर (FCFS-2) प्रवेश घेण्यासाठी प्रवेशाच्या संकेतस्थळावर लिंक सुरु राहणार आहे.**

**२) प्रथम प्राधान्य या तत्वावर (FCFS-2) या मध्ये Student Login – Participate—Stream--- Medium--- College Name--- Apply Now या क्रमाने क्लिक करुन विद्यार्थ्यांने रिक्त जागेवर आपला प्रवेश निश्चित करावा.**

**३) रिक्त जागेवर प्रवेश झाल्याचा मेसेज आल्यावर किंवा त्याची प्रिन्ट घेऊन संबधित कॉलेजमध्ये प्रत्यक्ष जाऊन त्याच दिवशी किंवा दिनांक २५.०९.२०१७ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत आपला प्रवेश आवश्यक ती कागदपत्रे सादर करुन व फी भरुन घ्यावा.**

**४) सर्व प्रकारचे कोटा प्रवेश महाविद्यालय स्तरावर दिनांक २५.०९.२०१७ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत सुरु राहतील.**

**५) या कालावधीत नवीन अर्ज व ज्या विद्यार्थ्याचा अर्ज Pending Status आहेत अशासाठी ॲप्रुव्हल देण्यासाठी मार्गदर्शन केंद्रे सुरु राहतील.**

**६) ज्या विद्यार्थ्यांनी यापुर्वी आपला प्रवेश घेतलेला आहे असा प्रवेश रद्द करण्यासाठी, प्रवेश रद्द करण्याची लिंक (Cancellation Link) उपलब्ध नाही.**

**७) प्रथम प्राधान्य या तत्वावर (FCFS-2) ही शेवटची व अंतिम फेरी असल्यामुळे दिनांक २५.०९.२०१७ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत सर्व विद्यार्थ्यांनी उपलब्ध असलेल्या रिक्त जागांवर आपला प्रवेश निश्चित करावा, त्यानंतर कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ दिली जाणार नाही याची सर्व प्राचार्य, पालक व विद्यार्थी यांनी नोंद घ्यावी.**

सदरचे प्रसिध्दीनिवेदन या कार्यालयाच्या **www.dydepune.com** व इ.११वी ऑनलाईन प्रवेशाच्या **http://pune.11thadmission.net** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(दिनकर टेमकर)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग पुणे-१

19.9.